वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.६ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३


# बाबासाहेबांची लेक होणार बीड शहराची प्रथम नागरिक

## मुस्लिम मतदान निर्णायक, ते ज्यांच्या बाजुने तेच होईल बीडच्या नगराध्यक्षा

### पप्पू कागदे, सचिन सोनवणे, विष्णू वाघमारे, संपादक शेख मुजीब यांची पत्नींची चर्चा

Email.- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email.-editordivyawarta@gmail.com

# बीडच्या 'युवराज'ची फारच फजिती झाली, आमदार की गेली नगराध्यक्षपदाची संधी हुकली हातात आला घंटा



## आता नगरसेवकही होता येते की नाही? हे पहावे लागेल

बीड (दिव्य न्युज):- राज्यातील आगामी स्थानीक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने आज सोमवार रोजी २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर झाली. या सोडतीत बहुचर्चीत असलेली बीड नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची जागा ही एस.सी. महिलेसाठी सुटली. अनेक जण ही निवडणूक लढविण्यासाठी गुडघ्याला बाशींग बांधून तयार होते. मात्र आज कोजागिरीच्या चांदण्यात इच्छुकांच्या स्वप्नांवर अंधाराचे साम्राज्य पसरले.

# बीडची नगर पालिका होणार क्षीरसागर मुक्त

### जिल्ह्यातील सहाही नगर पालिकांचे आरक्षण जाहिर झाले; बीड- अनु.जाती महिलासाठी, माजलगाव-ओबीसी महिला, अंबाजोगाई-ओबीसी पुरूष, गेवराई-सर्वसाधारण, परळी-सर्वसाधारण महिला, धारूर-सर्वसाधारण

तिकडे परळी वैजिनाथ ही नगरपालिका अध्यक्षपदाची जागा सर्वसाधारण महिलेसाठी, गेवराई-सर्वसाधारण महिला, धारूर-सर्वसाधारण पुरुष, अंबाजोगाई-ओबीसी महिला, माजलगाव - ओबीसी महिलासाठी सुटली असून दिवाळीनंतर लगेच स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा धुराडा उडणार आहे.दरम्यान बीडच्या नगराध्यक्षपदासाठी आता चर्चेला सुरूवात झाली असून रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, माजी जेष्ठ नगरसेवक विष्णू वाघमारे, माजी नगरसेवक तथा सर्व समाजाशी एकीचे संबंध असणारे व प्रत्येकाच्या सुखदुखात नेहमी असणारे सचिन आप्पा सोनवणे व सायं.दै.सिटीझनचे संपादक शेख मुजीब यांच्या नावाची चर्चा शहरभरात होत असून आता कोणाला संधी मिळते हे पाहवे लागेल. गेल्या दशकभराच्या आसपास स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. अशा स्थितीत स्थानीक स्वराज्य संस्थेवर आपले आधिराज्य असावे यासाठी जुने-नवे पुढारी उद्याच्या निवडणुकीत मोठ्या ताकतीने उतरणार. यासाठी अनेकांनी तयारी दाखवली. बीड नगराध्यक्षपदासाठी इच्छुकांची बहुगर्दी ओपनमध्ये पहावयास मिळत होती. जो तो अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी गेल्या कित्येक दिवसांपासून लॉबिंग करताना दिसून येत होतं. कोणी पक्ष बदल होते, कोणी आपआपल्या पक्षाच्या मातब्बरांच्या बगलेत राहत होते. आपणच अध्यक्ष होणार,

▶▶ पान २ वर

## बीड जिल्हा सोलार वेंडर्स असोसिएशनची स्थापना



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यावसायिकांना एकत्र आणण्यासाठी 'बीड डिस्ट्रिक्ट सोलार वेंडर्स असोसिएशन' ची स्थापना करण्यात आली. हा कार्यक्रम शनिवारी (दि. ४ ऑक्टोबर २०२५) रोजी यशराज इन, जालना रोड, बीड येथे पार पडला.

▶▶ पान २ वर




## बीडमध्ये रस्ता व नाली कामांच्या विलंबाबाबत एसडीपीआयचे शांततापूर्ण आंदोलन

### नगर परिषदेला निवेदन सादर




बीड , (दिव्य न्युज):- वार्ड क्रमांक २१, सैयद अली नगर, तेलगाव रोड परिसरात अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या रस्ता व नाली कामांविषयी नागरिकांनी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (डउ्झख) च्या वतीने सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयासमोर शांततापूर्ण धरना आंदोलन केले.

या आंदोलनात स्थानिक नागरिकांसोबत मोठ्या संख्येने महिला, मुले तसेच डउ्झख चे पदाधिकारी सहभागी झाले. आंदोलनादरम्यान नागरिकांनी रस्ता आणि नालीचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली.धरना आंदोलनात डउ्झख चे कार्यकारिणी सदस्य कलीम इनामदार

▶▶ पान २ वर

### बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेच्या मोर्चाची प्रशासनाने घेतली दखल

# बीड जिल्ह्यातील ३६ वाळूघाट सुरू होणार

## हप्तेखोरी राखल्यावरच स्वस्त वाळू मिळणार



बीड, (दिव्य न्युज):- वर्षापासून विविध कारणांमुळे बंद असलेले वाळूघाट आता पुन्हा सुरु होणार आहेत. जिल्ह्यातील पर्यावरण अनुज्ञप्ती प्राप्त ३६ वाळूघाटांच्या ई-लिलाव प्रक्रियेची पहिली फेरी बीड जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. शासन निर्णयानुसार, जिल्ह्यातील सर्व वाळूघाटांना एकत्र करून निविदा मागविण्यात

▶▶ पान २ वर

### २८ ऑक्टोबर ई-निविदा सादर करण्याची अंतिम मुदत

१ ऑक्टोंबर रोजी ई-निविदा जाहीर प्रसिद्धी करण्यात आली असून १ ऑक्टोंबर ते २८ ऑक्टोंबरपर्यंत ई-निविदा ऑनलाइन टोकन रक्कम जमा करणे, अनामत रक्कम ऑनलाइन जमा करणे, २८ ऑक्टोंबर ई-निविदा सादर करण्याची अंतिम मुदत असणार आहे. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शक्य झाल्यास तांत्रिक लिफाफा उघडण्यात येणार आहे.

### वाळू माफियांसह हप्तेखोर अधिकाऱ्यांकडून चाचपणी

वाळू टेंडर जाहीर होताच जिल्ह्यातील वाळू माफिया आणि हप्तेखोर अधिकारी वर्गात चाचपणी सुरु झाली आहे. मागील काही महिन्यांपासून वाळू बंद असल्याने महसूल आणि पोलिस विभागातील काही भ्रष्ट मंडळींचे खिसे रिकामे झाले होते. आता वाळूघाट सुरु होताच अनियमिततेसाठी चाचपणी सुरु झाल्याची चर्चा प्रशासनात आहे.

# वाल्मिक कराड जेलमध्ये, पण बाहेर पैशाची मागणी

# सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल, बॅनरवर मुंडे बहीण-भावाचा फोटो




**बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि खंडणी प्रकरणी जेलमध्ये असलेल्या वाल्मीक कराड प्रकरणात नवी माहिती समोर आली आहे. वाल्मीक कराड जेलमध्ये असताना देखील बाहेर त्याच्या नावाने पैसे मागितले जात आहे. सोशल मीडियावर वाल्मीक कराडच्या नावाने पोस्ट व्हायरल होत आहेत. महत्वाचे म्हणजे वाल्मीक कराडच्या बॅनरवर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे फोटो आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडच्या नावाने सध्या सोशल मीडियावर आर्थिक निधी गोळा करण्यासाठी बॅनर व्हायरल होत आहेत. वाल्मीक (अण्णा) कराड संघटना मित्र मंडळ मजबूत करण्यासाठी तसेच सोशल मीडियावर 'वाल्मीक अण्णाचे नाव आणि चेहरा सातत्याने टिकून राहण्यासाठी आपले आर्थिक सहाय्य फार महत्त्वाचे आहे.', 'फुल ना फुलाची पाकळी दान करून मदत करा तेव्हाच अण्णा आपल्यामध्ये एक दिवस येतील.. थोडीशी मदत.. आण्णासाठी, आपल्या स्वाभिमानासाठी' अशा मजकुराचे हे बॅनर सोशल माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

यासोबत वाल्मीक कराडच्या पोस्टसोबत 'फोन पे'चे स्कॅनर देखील लावण्यात आले आहे. जे संदीप गोरख तांदळे नावाच्या व्यक्तीच्या बँक खात्याचे आहे. संदीप तांदळे या व्यक्तीने आमदार सुरेश धस, आमदार जितेंद्र आव्हाड आणि विजयसिंह बांगर यांना व्हिडिओ बनवून खुलेआम धमकी दिली होती. एवढेच नाही तर सावरगाव येथील भगवान भक्ती गडावर याच संदीप तांदळेने वाल्मीक कराडचा फोटो झळकावला होता. आता मदत निधीचे बॅनर व्हायरल झाल्यानंतर हे बॅनर कोणी तयार केले? त्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी भगवान भक्ती गडाच्या ट्रस्टने केली आहे. दरम्यान याप्रकरणी अंमळनेर पोलिसात तक्रार देखील देण्यात आली आहे.

# अ़हमदनगरसह राज्यातील दगली कशासाठी ?

## संजय राऊतांचा व्हिडिओ आणला समोर



अहमदनगर , (दिव्य न्युज):- 'राज्यातील अतिवृष्टीवरून, पूरपरिस्थितीवरून लक्ष विचलित करण्यासाठी हे उद्योग सुरू आहे. तसंच अहिल्यानगरमधील महापालिकेतील साडेचारशे कोटींच्या रस्त्यांच्या कामातील भ्रष्टाचारावरून लक्ष दुसरीकडे नेण्यासाठी तिथं दंगल घडवली गेली,' असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. शिवसेना ठाकरे सेना पक्षाचे अहमदनगरमधील शहरप्रमुख किरण काळे यांनी खासदार राऊतांचा व्हिडिओ शेअर करत, ही माहिती दिली.

खासदार संजय राऊत यांनी, अहिल्यानगर मधल्या महापालिकेतला साडेचारशे कोटींचा रस्त्यांच्या कामांचा भ्रष्टाचार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना पक्षाने बाहेर काढला. ते प्रकरण आता न्यायालयात गेलं आहे. हे प्रकरण काढलं म्हणून आमचा शहरप्रमुख किरण काळेंना अटक केली गेली.अहिल्यानगरमध्येही प्रचंड अतिवृष्टी झाली. या सगळ्या वरच लक्ष विचलित करण्यासाठी काहींना दंगली घडवायच्या आहेत. हे जे काही बाडगे हिंदुत्ववादी आहेत, जे आज टिळा लावून फिरत आहेत, ते अशा प्रकारच्या दंगली अहमदनगरमध्ये घडवत आहेत, असा घणाघात राऊतांनी केला आहे.

अहिल्यानगर महापालिकेतील बाहेर काढलेला रस्ते घोटाळा, राज्यात वाढवत चालेली धार्मिक तेढ, तणावपूर्ण परिस्थिती, अतिवृष्टी याबाबत प्रसार माध्यमांशी खासदार संजय राऊत यांनी संवाद साधला आहे. ते म्हणाले, अनेक गोष्टी चर्चेतून सुटू शकतात. पण प्रशासनाला आदेश आहेत की तणाव निर्माण होईल, अशा प्रकारचे निर्णय घ्या. प्रश्न सोडवू नका. पोलिसांनी अशा प्रकारचं वर्तन करणं हे कायदा, सुव्यवस्थेसाठी योग्य नाही. 'मराठवाड्यामध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर सरकारचा बोजवारा उडाला आहे. तो झाकण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या उप कंपन्या या दंगली घडवण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रातलं वातावरण आता दंगलींपेक्षा पूर परिस्थिती, अतिवृष्टी यावर चर्चा करण्याची गरज असताना त्याच्यावरचे लक्ष विचलित करण्यासाठी, सरकार शेतकऱ्यांना मदत करण्यात कसं अपयशी आहे यावरून लक्ष हटवण्यासाठी हे सुरू आहे,' असा गंभीर आरोप खासदार राऊतांनी केला आहे.

'हा देश हिंदूंचा आहे. या देशामध्ये हिंदुत्ववाद राहणार. प्रभावीपणे राहणार. हे आम्ही सांगतो आहोत. या हिंदुत्ववाद्यांनी जरी दंगली घडवल्या. मात्र त्यांनी भारत-पाकिस्तान सामन्याला विरोध नाही केला. त्या सामन्याचं मानधन पाकिस्तानी खेळाडूंनी तिथल्या एका प्रमुख दहशतवाद्याच्या संघटनेला दिलं आहे. मसूद अझहरला दिलं आहे. या गोष्टींना विरोध करण्याची यांच्याच हिम्मत नाही. हे जे काही आता महाराष्ट्रात अहिल्यानगरसह इतरत्र दंगली घडवत आहेत, हे बोगस आणि भंपक हिंदुत्ववादी आहेत. ढोंगी लोकं आहेत,' असा घणाघात देखील संजय राऊतांनी केला.

# सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न

मुंबई , (दिव्य न्युज):- आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान धक्कादायक घटना घडली. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला. सुप्रीम कोर्टात वकिलाकडून सुनावणी दरम्यान बूट फेकण्याचा प्रयत्न झाला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला वेळीच रोखलं. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वकिलाने सुनावणी दरम्यान मंचाच्याजवळ जाऊन बूट काढून फेकण्याचा प्रयत्न केला. पण वेळीच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला अडवलं. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला कोर्टाबाहेर काढलं. यावेळी तो वकिल आरडाओरडा करत होता, ' 'सनातनचा अपमान सहन करणार नाही'. उगख गवई हे सर्व सुरु असताना शांत होते. ते म्हणाले की, 'अशा प्रकारांनी आम्ही विचलित होत नाही. तुम्ही तुमचा युक्तीवाद सुरु ठेवा'



असं म्हटलं जातय की, खजुराहो येथील भगवान विष्णुंच्या एका नुकसानग्रस्त मुर्तीशी संबंधित एक जुन्या प्रकरणात सरन्यायाधीशांनी एक टिप्पणी केली. या टिप्पणींचा अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध केलाय. सुरक्षारक्षक या घटनेचा इन्कार करतायत. ते म्हणतायत की, 'कोर्टात एका माणसाने आरडाओरडा केला. त्याला आम्ही बाहेर काढलं'खजुराहो येथे भगवान विष्णुंच्या नुकसानग्रस्त मुर्तीची पुनर्स्थापना करण्याबद्दलच्या याचिकेवर मुख्य न्यायाधीश गवई बोललेले. जा, देवांनाच काहीतरी करायला सांग. तू म्हणतोस तू भगवान विष्णूंचा कट्टर भक्त आहेस, तर जा आणि आता प्रार्थना करं. हे एक पुरातत्व स्थळ आहे. -डख आदींची अनुमती आवश्यक आहे. क्षमा करा त्यांच्या या वक्तव्यानंतर विरोधाची मोठी लाट उठलेली. अनेकांनी सरन्यायाधीशांच्या राजीनाम्याची मागणी केलेली.वाद वाढल्यानंतर मुख्य न्यायाधीश म्हणालेले की, त्यांच्या टिप्पणीला सोशल मीडियावर चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आलं. कोणीतरी मला सांगितलं की, माझ्या टिप्पणीला सोशल मीडियावर एका खास पद्धतीने सादर केलं जातय. मी सर्व धर्मांचा सन्मान करतो

# उकिरड्याच्या खड्ड्यात बुडून चिमुकलीचा मृत्यू



केज (दिव्य न्युज):- तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील बजगुडे वस्तीवर रविवार (दि.५)रोजी सायंकाळी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. घराशेजारी उकिरड्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बुडून आर्या अमोल बजगुडे (वय ७) या पहिलीत शिकणाऱ्या चिमुकलीचा मृत्यु झाला.

आर्याचे आई-वडील, अमोल बजगुडे आणि त्यांची पत्नी, हे दोघेही रविवारी शाळेला सुट्टी असल्याने पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या आर्याला घरी ठेवून घराशेजारील शेतात कामासाठी गेले होते. सायंकाळी ५ च्या सुमारास आर्या खेळता खेळता घराजवळील उकिरड्यासाठी खोदलेल्या खड्ड्याजवळ गेली.या खड्ड्यात पावसाचे पाणी साचले होते. अचानक, आर्याचा तोल गेला आणि ती साचलेल्या पाण्यात पडली. बराच वेळ होऊनही आर्या न दिसल्याने आईने घरी धाव घेतली. तेव्हा आर्या खड्ड्यातील पाण्यात पडल्याचे त्यांच्या लक्षात आले.आर्याच्या आईने तात्काळ तिला पाण्यातून बाहेर काढले.नाका-तोंडात पाणी गेल्यामुळे तिची प्रकृती चिंताजनक होती. आई-वडिलांनी तिला केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच नाका-तोंडात पाणी जाऊन आर्याचा मृत्यु झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. चिमुकलीच्या अशा अचानक जाण्याने बजगुडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पान ४ वरून

## शिरूर कासार

कौतुक केले. नागरिकांनी म्हटले की, पूर आला, घर वाहून गेले, पण माणुसकी वाहून गेली नाही - हाजी जुबेर यांनी तिचं दर्शन घडवलं. सहारा एज्युकेशन ट्रस्टचा हा उपक्रम म्हणजे केवळ मदतीचा नाही, तर मानवतेचा उत्सव आहे. कोणतीही जाहिरात, कोणताही गाजावाजा न करता केलेली ही मदत लोकांच्या मनाला भिडली असून, नागरिकांकडून 'हाजी जुबेर यांचा उपक्रम म्हणजे मदतीचा सच्चा हात' अशी सर्वत्र चर्चा सुरू आहे. पूरग्रस्तांना दिलासा देत असतानाच हाजी जुबेर यांनी सांगितले की, गरिब, पीडित आणि संकटात सापडलेल्यांना मदत करणे हेच आमचे कर्तव्य आहे. धर्म, जात, पक्ष न पाहता समाजसेवा हीच आमची ओळख आहे. पूरानंतरही अशा सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येणे म्हणजे समाजात सकारात्मकतेचा संदेश देणारी घटना ठरली आहे.

## छत्रपती संभाजी महाराज

तसेच क्रीडांगणातील ओपन जिममधील साहित्य तुटलेले आणि निष्क्रिय झाले असून, त्याकडेही नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे मैदानाची स्वच्छता, सुरक्षारक्षकांची नेमणूक आणि जिम उपकरणांची दुरुस्ती या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

=ं सत्याग्रह आंदोलन

या सर्व मागण्यांसाठी आणि क्रीडांगणाच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०६ ऑक्टोबर, सोमवार रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील महात्मा गांधी स्मारकासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान क्रीडांगणाचा राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरावर कायमस्वरूपी बंदी घालावी, तसेच मैदानाचे संवर्धन आणि संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नेमावा अशी ठोस मागणी करण्यात आली.

आंदोलनानंतर नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि क्रीडामंत्री यांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन क्रीडांगणाचे पुनर्वसन व दुरुस्ती कार्य हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलनात प्रा.डी.जी.तांदळे मार्गदर्शन बीड शहर बचाव मंच, अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी, रामधन जमाले, जिल्हाध्यक्ष (इंटक), नितीन सोनावणे जिल्हाध्यक्ष आल इंडिया पँथर सेना बीड, नितिन जायभाये, अध्यक्ष बीड शहर बचाव मंच, सखाराम बेंगडे, सचिव (इंटक), शेख मुबीन, शेलार शिवशर्मा, शेख मुस्ताक माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ आदींनी

पान १ वरून

## बाबासाहेबांची

आपल्यालाच उमेदवारी मिळणार, या दृढ आत्मविश्वासात वावरत होते. अध्यीपदाचे दिव्य स्वप्न पाहणार्यांना आरक्षण सोडतीत कोजागिरीच्या पोर्णिमेला दिवसा चांदणं दिसलं आणि त्यांच्या स्वप्नांना काळोख्याने माखले. अशी काहींची स्थितीत बीडमधील इच्छुकांची पहावयास मिळत असून बीडची जागा ही एस.सी. महिलेसाठी सुटली आहे. सोशल मिडियावर 'बाबासाहेबांची लेक अध्यक्ष होणार' असे आत्मविश्वासी ब्रिद व्हायरल होत असून बीडसाठी 'जय भीम'चा नारा सर्वत्र गुंजताना दिसून येत आहे. दुसरीकडे मुंडे बंधू-भगिनींच्या परळी नगरपालिकेची जागा ही सर्वसाधारण महिलेसाठी सुटली आहे. गेवराई सर्वसाधारण महिला, धारूर -सर्वसाधारण पुरुष, अंबाजोगाई - ओबीसी महिला, माजलगाव - ओबीसी महिला प्रवर्गासाठी सोडण्यात आली आहे. सोडत सुरू असून अन्य जागांच्या सोडती सुरू आहेत.

## बीड जिल्हा सोलार

या प्रसंगी जिल्ह्यातील सर्व सोलार व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेमध्ये असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने करण्यात आली.पदाधिकारी पुढीलप्रमाणे:- अध्यक्ष - डी. बी. खान, उपाध्यक्ष - संजय सानप, सचिव - गोपाळ पारीख, कोषाध्यक्ष - अशोक सिकची, कार्यकारी सदस्य - अनिल राऊत, वल्लभ दिवटे, उमेश करपे.

असोसिएशनचे उद्देश- असोसिएशनच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश म्हणजे खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या सोलार जाहिरातींना आळा घालणे, ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि सोलार प्रकल्पांबाबत पारदर्शकता राखणे हा आहे.सभासदांना सोलार क्षेत्रातील अद्ययावत माहिती व प्रशिक्षण देणे, शासकीय कार्यालयांमधील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच राज्य व केंद्र शासनाच्या सर्व सौर ऊर्जा योजनांच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करणे हेही संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

याशिवाय चछठए आणि चडएऊड सोबत समन्वय साधून गुणवत्तापूर्ण सोलार इंस्टॉलेशनला प्रोत्साहन देणे, सोलार वेंडर आणि ग्राहक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे आणि हरित उर्जेचा प्रसार करणे, या दिशेने असोसिएशन कार्यरत राहणार आहे.सभेच्या शेवटी उपस्थित व्यावसायिकांनी संघटनेच्या स्थापनेबद्दल समाधान व्यक्त करत बीड जिल्ह्यातील सोलार क्षेत्रात शिस्त, गुणवत्ता आणि ग्राहकहिताचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला. जिल्ह्यातील सर्व सोलार व्यवसायिक उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यातील

आल्या असून यासाठी आवश्यक वेळापत्रकही प्रसिद्ध करण्यात आले आहे. तर दुसरीकडे हप्तेखोरी रोखण्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांसमोर मोठे आव्हान असणार आहे. कारण हप्तेखोरी रोखल्यावरच वाळू स्वस्त मिळेल, अन्यथा टेंडर होऊनही वाळूसाठी मोठी रक्कम मोजावी लागणार आहे.

ई-लिलाव प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी सर्व वाळूघाटांची माहिती महसूल विभाग, वन विभाग आणि बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक कंत्राटदारांना वेळेत अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर करता यावीत यासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. वाळूघाटांच्या ई-लिलावात सहभागी होणाऱ्यांनी टोकन रक्कम आणि अनामत रक्कम ठरविक कालावधीत ऑनलाइन जमा करणे बँ आहे. चीं ळपषीारलळ२प जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल व तहसील कार्यालयांतून आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. या प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील वाळु पुन्हा नियमबद्ध पद्धतीने सुरु होणार आहे. यातून जिल्ह्यातील बांधकाम उद्योग, घरकूल लाभार्थी आणि सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ब्लॅकलिस्ट केलेल्या टिप्पर मालकांची धावपळ

तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अवैध वाळू उपसा आणि वाहतूक प्रकरणात सुमारे ४० टिप्पर वाहनांवर दंडात्मक कारवाई केली होती. कोटी-कोटी रुपयांचा दंड या वाहनांना देण्यात आला होता, तसेच काही मालमत्तांवर बोजाही टाकण्यात आला. या वाहनांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले असून, आता वाळूघाट सुरु होत असल्याने या टिप्पर मालकांची धावपळ सुरु आहे. त्यांचे वाहन पुन्हा वापरता येणार का, याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.